## सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३१.

[मुंबईचा इमारती बांधणें, पुन्हा बांधणें व त्यांचें रूपांतर करणें यांवर नियंत्रण ठेवण्याबाबत अधिनियम, १९४८.]

[१० एप्रिल १९४८.]

ह्या अधिनियमांत पुढील आदेश व अधिनियम यांअन्वयें अनुकूलन, रूपभेद व सुधारणा करण्यांत आल्या आहेत :—

सन १९४८ चा मुंबई अधिनियम ६९.

*सन १९५० चा मुंबई अधिनियम १५.

विधि अनुकूलन आदेश, १९५०.

सन १९५३ चा मुंबई अधिनियम ५३.

सन १९५४ चा मुंबई अधिनियम ५८.

### मुंबई प्रांतांत इमारती बांधणें, पुन्हा बांधणें व त्यांचें रूपांतर करणें यांवर नियंत्रण ठेवण्यासाठीं तरतूद करण्याबाबत अधिनियम.

ज्याअर्थी, अधिक चांगल्या राहण्याच्या जागा उपलब्ध करून देण्याच्या हेतूनें आणि इमारतींची वाढ काटकसरीनें व पद्धतशीर रीतीनें व्हावी तसेंच सार्वजनिक करमणुकीच्या व औद्योगिक उपक्रमाच्या कारणासाठीं बांधावयाच्या किंवा पुन्हा बांधावयाच्या इमारती ह्या गर्दी व उपद्रव टाळण्याकरितां योग्य ठिकाणीं बांधण्यांत याव्यात या हेतूनें मुंबई प्रांतांत इमारती बांधणें, पुन्हा बांधणें आणि त्यांचें रूपांतर करणें यांवर नियंत्रण ठेवण्यासाठीं आणि कांहीं इतर कारणांसाठीं तरतूद करणें इष्ट आहे ; त्याअर्थी, याअन्वयें पुढीलप्रमाणें अधिनियम करण्यांत आला आहे :—

१. (१) ह्या अधिनियमास मुंबईचा इमारती बांधणें, पुन्हा बांधणें व त्यांचें रूपांतर करणें यांवर नियंत्रण ठेवण्याबाबत अधिनियम, १९४८ असें म्हणावें. लघुसंज्ञा, व्याप्ति व लागू करणें.

(२) तो अनुसूचींत निर्दिष्ट केलेल्या क्षेत्रांस लागू आहे.

---

*मुंबईचा इमारती बांधण्यावर नियंत्रण ठेवण्याबाबत (सुधारणा) अधिनियम, १९५० (सन १९५० चा मुंबई अधिनियम १५) याचें कलम ६ पुढीलप्रमाणें आहे :—

६. बचाव. उक्त अधिनियमांत ह्या अधिनियमाअन्वयें केलेल्या सुधारणांमुळें पुढील गोष्टींस बाध येणार नाहीं :—

(१) ह्या अधिनियमाच्या सुरुवातीपूर्वीं आधींच संपादन केलेला, प्राप्त झालेला किंवा पत्करलेला कोणताहि हक्क, बंधन किंवा जबाबदारी, अथवा

(२) ह्या अधिनियमाच्या सुरुवातीपूर्वीं केलेल्या कोणत्याहि अपराधाच्या संबंधांत प्राप्त झालेली कोणतीहि शास्ति, जप्ती किंवा शिक्षा, अथवा

(३) कोणताहि असा हक्क, बंधन, जबाबदारी, शास्ति, जप्ती अगर शिक्षा किंवा ह्या अधिनियमाच्या सुरुवातीपूर्वीं केलेलें किंवा करूं दिलेलें कोणतेंहि कृत्य यासंबंधांत करावयाची किंवा केलेली कोणतीहि वैध कारवाई किंवा उपाययोजना ;

आणि जणूं हा अधिनियम संमत झाला नव्हता असें समजून अशी कोणतीहि वैध कारवाई किंवा उपाययोजना दाखल करतां येईल, चालू ठेवतां येईल किंवा अंमलांत आणतां येईल आणि कोणतीहि अशी शास्ति, जप्ती किंवा शिक्षा करतां येईल.

(३) राज्य सरकारास, राजपत्रांत प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारें असा निदेश देण्याचा अधिकार आहे कीं, तो अशा अधिसूचनेंत निर्दिष्ट केलेल्या कोणत्याहि इतर क्षेत्रासहि लागू होईल.

(४) ज्या क्षेत्रांस प्रस्तुत अधिनियम त्या त्या वेळीं लागू असेल त्या क्षेत्रांत, मुंबईचा इमारती बांधण्यावर नियंत्रण ठेवण्याबाबत (सुधारणा) अधिनियम, १९५० सुरू झाल्याच्या तारखेनंतर प्रस्तुत अधिनियमाचे उपबंध नाट्यगृह, चित्रपटगृह किंवा सार्वजनिक करमणुकीची कोणतीहि इतर जागा यासाठीं उपयोग करण्याचें योजिलेल्या इमारतींसच फक्त लागू होतील :

परंतु, मुंबई शहरांत, मुंबई उपनगर जिल्ह्यांत व ठाणें जिल्ह्याच्या ठाणें तालुक्यांत उक्त उपबंध हे उक्त तारखेनंतर औद्योगिक उपक्रमाकरितां उपयोग करण्याचें योजिलेल्या इमारतींस देखील लागू होतील :

तसेंच, राज्य सरकारास, राजपत्रांत प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारें असा निदेश देण्याचा अधिकार आहे कीं, ह्या अधिनियमाचे उपबंध अधिसूचनेंत निर्दिष्ट करण्यांत येईल अशा क्षेत्रांस, अशा पूर्वोक्त वर्गातील इमारतींस व अशा तारखेपासून लागू होतील.

व्याख्या.

२. विषयांत किंवा संदर्भात एतद्विरुद्ध कांहीं नसल्यास, ह्या अधिनियमांत—

(१) "इमारत" या संज्ञेचा अर्थ, ज्यांत विटा, सिमेंट, अॅस्बेस्टॉस सिमेंटचे पत्रे, लोखंड, पोलाद किंवा राज्य सरकार राजपत्रांत प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारें निर्दिष्ट करील असें कोणतेंहि इतर सामान याचा ज्यांत उपयोग करण्यांत येत असेल असें घर, पडघर, तबेला, छपरी, झोपडी व इतर प्रत्येक बांधकाम, असा समजावा ;

स्पष्टीकरण.—खिळे, दरवाजे, खिडक्या व बंद करण्याचीं साधनें यांसाठीं लोखंड किंवा पोलाद याचा उपयोग करणें हें ह्या व्याख्येच्या अर्थानुसार लोखंड किंवा पोलादाचा उपयोग करणें होते असें समजतां कामा नये.

(२) "नियंत्रक" म्हणजे कलम ३ अन्वयें नियंत्रक म्हणून नेमलेला इसम ;

(२-अ) "इमारतींचें रूपांतर करणें" या शब्दप्रयोगाचा अर्थ, हा अधिनियम लागू असलेली जी कोणतीहि इमारत, औद्योगिक उपक्रमाच्या कारणाव्यतिरिक्त इतर कोणत्याहि कारणासाठीं बांधण्यांत आलेली होती किंवा पुन्हा बांधण्यांत आली होती किंवा वापरण्यांत आलेली होती किंवा वापरण्यासाठीं योजिलेली होती अशी इमारत औद्योगिक उपक्रमाच्या कारणासाठीं वापरणें किंवा वापरण्याची परवानगी देणें असा समजावा ; आणि "रूपांतर करणें" या शब्दप्रयोगाचा अर्थ त्याप्रमाणें लावण्यांत आला पाहिजे :

परंतु, एखादी इमारत गुदाम, कोठार किंवा वखार म्हणून वापरण्यांत येत होती याच केवळ कारणावरून ती औद्योगिक उपक्रमाच्या कारणासाठीं वापरण्यांत आली होती किंवा वापरण्याची परवानगी देण्यांत आली होती असें समजतां कामा नये ; परंतु अशी इमारत कोणत्याहि इतर औद्योगिक उपक्रमाच्या कारणासाठीं वापरण्यांत आल्यामुळें झालेला कोणताहि बदल हा अशा इमारतीचें रूपांतर आहे असें समजण्यांत आलें पाहिजे.

(३) "इमारत बांधणें किंवा पुन्हा बांधणें" या शब्दप्रयोगांत कोणत्याहि इमारतींत कोणताहि फेरबदल करणें, तिचा विस्तार करणें किंवा तिच्यांत वाढ करणें यांचा समावेश होतो ; आणि "इमारत बांधणें किंवा पुन्हा बांधणें" या शब्दप्रयोगाचा अर्थ त्याप्रमाणें लावण्यांत आला पाहिजे.

(४) "विहित" म्हणजे ह्या अधिनियमाअन्वयें केलेल्या नियमांनीं विहित केलेलें.

इमारतींच्या नियंत्रकांची नेमणूक.

३. राज्य सरकारास, राजपत्रांत प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारें ह्या अधिनियमाच्या प्रयोजनांकरितां कोणत्याहि क्षेत्रासाठीं इमारतींचे नियंत्रक म्हणून एक किंवा अधिक इसम नेमण्याचा अधिकार आहे.

**इमारती बांधणें किंवा पुन्हा बांधणें किंवा इमारती बांधण्याचें किंवा पुन्हा बांधण्याचें चालू ठेवणें किंवा त्याचें रूपांतर करणें याकरितां परवानगी-साठीं अर्ज.**

४. (१) इमारत बांधण्याचें किंवा पुन्हा बांधण्याचें काम सुरू करण्याची ज्याची इच्छा असेल किंवा हा अधिनियम ज्या तारखेस अंमलांत आला त्या तारखेपूर्वी सुरू केलेलें इमारत बांधण्याचें किंवा पुन्हा बांधण्याचें काम चालू ठेवण्याची ज्याची इच्छा असेल अशा प्रत्येक इसमानें तसेंच इमारतीचें रूपांतर करण्याची ज्याची इच्छा असेल अशा प्रत्येक इसमानें तसें करण्याकरितां परवानगी मिळण्यासाठीं नियंत्रकाकडे लेखी अर्ज केला पाहिजे. असा अर्ज विहित करण्यांत येईल अशा नमुन्याप्रमाणें असला पाहिजे आणि असा अर्ज ज्या इमारतीच्या बाबतींत केला असेल त्या इमारतीसंबंधीं विहित करण्यांत येईल अशी माहिती त्यांत असली पाहिजे.

(२) असा अर्ज मिळाल्यावर, नियंत्रक त्यास आवश्यक वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, राज्य सरकार याबाबत देईल अशा सामान्य किंवा विशेष आदेशांस अधीन राहून, लेखी आदेशाद्वारें—

(अ) अशा आदेशांत निर्दिष्ट करण्यांत येतील अशा कोणत्याहि शर्तीस अधीन ठेवून परवानगी देईल, अथवा

(ब) अशी परवानगी देण्याचें नाकारील.

(३) नियंत्रकास पोट-कलम (१) अन्वयें केलेला अर्ज मिळाल्यापासून तीन महिन्यांच्या मुदतीच्या अखेरीस जर नियंत्रकानें कोणताहि लेखी आदेश दिला नाहीं तर, अशी परवानगी कोणतीहि शर्त न घालतां देण्यांत आली आहे असें समजलें पाहिजे.

५. [राज्य सरकारनें परवानगी रद्द करणें किंवा तींत फेरफार करणें.] सन १९५३चा मुंबई अधिनियम ५३, कलम ७ अन्वयें गाळण्यांत आलें.

**अपील करण्याचा हक्क.**

६. (१) कलम ४, पोट-कलम (२) अन्वयें नियंत्रकानें दिलेल्या आदेशामुळें आपल्यावर अन्याय झाला आहे असें समजणाऱ्या कोणत्याहि इसमास, असा आदेश त्यास कळविल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आंत, राज्य सरकारकडे अपील करण्याचा अधिकार आहे.

(२) अशा अपिलावर राज्य सरकारनें दिलेला आदेश अखेरचा असेल.

**नुकसान-भरपाई मागण्यास मनाई.**

७. (अ) कलम ४, पोट-कलम (२) अन्वयें नियंत्रकानें दिलेल्या कोणत्याहि आदेशामुळें, अथवा

(ब) कलम ६ अन्वयें राज्य सरकारनें दिलेल्या कोणत्याहि आदेशामुळें, अथवा

(क) ह्या अधिनियमाअन्वयें सद्‌भावनापूर्वक केलेल्या किंवा जें करण्याचा इरादा आहे अशा कोणत्याहि कृत्यामुळें

कोणत्याहि इसमाची जी कोणतीहि हानी किंवा नुकसान झालें असेल त्याबद्दल त्यास नुकसान-भरपाई मागतां येणार नाहीं.

**इतर अधिनियमांचा बचाव.**

८. त्या त्या वेळीं अंमलांत असलेल्या कोणत्याहि इतर अधिनियमाअन्वयें इमारत बांधणें किंवा पुन्हा बांधणें किंवा तिचें रूपांतर करणें यांवर निर्बंध घालण्याबाबत कोणत्याहि प्राधिकाऱ्याचा जो अधिकार असेल त्यास ह्या अधिनियमांतील कोणत्याहि उपबंधांमुळें बाध येणार नाहीं.

**शास्ति.**

९. (१) कलम ४ अन्वयें नियंत्रकानें दिलेल्या परवानगीवांचून किंवा कलम ४ अगर ६ अन्वयें दिलेल्या आदेशाअन्वयें घातलेल्या कोणत्याहि शर्तीचें उल्लंघन करून इमारत बांधण्याचें, पुन्हा बांधण्याचें किंवा तिचें रूपांतर करण्याचें कोणतेंहि काम सुरू करतां कामा नये, चालू ठेवतां कामा नये किंवा पार पाडतां कामा नये.

(२) जेव्हां पोट-कलम (१) चें उल्लंघन करून इमारत बांधण्याचें, पुन्हा बांधण्याचें किंवा तिचें रूपांतर करण्याचें कोणतेंहि काम सुरू करण्यांत, चालू ठेवण्यांत किंवा पार पाडण्यांत आलें असेल तेव्हां, ज्याच्या खर्चानें इमारत बांधण्याचें, पुन्हा बांधण्याचें किंवा तिचें रूपांतर करण्याचें

असें काम सुरू करण्यांत, चालू ठेवण्यांत, किंवा पार पाडण्यांत आलें असेल तो इसम, तसेंच असें काम सुरू करण्याचें, चालू ठेवण्याचें किंवा पार पाडण्याचें ज्यानें अंगीकृत केलें असेल असा कोणताहि इतर इसम आणि असें काम सुरू करण्याच्या, चालू ठेवण्याच्या किंवा पार पाडण्याच्या कामीं सल्लागार किंवा पर्यवेक्षक या नात्यानें कामावर नेमलेला शिल्पकार (आर्किटेक्ट) वास्तुविद्या-विशारद (इंजिनियर) किंवा इतर इसम ह्यांस दोषी ठरविण्यांत आलें असतां, पराकाष्ठा तीन महिने मुदतीच्या कैदेची शिक्षा होईल किंवा पराकाष्ठा एक हजार रुपये दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

(३) पोट-कलम (२) खालील अपराधाचा इन्साफ करणाऱ्या कोणत्याहि न्यायालयास कोणतेंहि सामान इमारत बांधण्याच्या किंवा पुन्हा बांधण्याच्या कामासाठीं जमविलें, खरेदी केलें किंवा अन्यथा मिळविलें होते अशी त्याची खात्री झाल्यास, तें सर्व सरकारजमा करण्याविषयीं आदेश देण्याचा अधिकार आहे.

कंपन्या वगैरे यांनीं केलेला अपराध.

१०. जेव्हां ह्या अधिनियमाखालील अपराध करणारा इसम हा, एखादी कंपनी किंवा इतर एकव्यक्तिभूत संस्था किंवा इसमांची मिळून झालेली मंडळी (मग ती संस्थापित असो किंवा नसो) असेल तेव्हां, असा अपराध घडल्याच्या वेळीं तिचा संचालक, व्यवस्थापक, चिटणीस, अभिकर्ता असलेला प्रत्येक इसम किंवा तिच्या व्यवस्थेशीं संबंध असलेला इतर अधिकारी किंवा इसम हा, असा अपराध आपल्या न कळत किंवा संमतीवांचून घडला असें सिद्ध न करील तर, तो अशा अपराधाबद्दल तरतूद केलेल्या शिक्षेस पात्र होईल.

प्रवेश करण्याचा अधिकार वगैरे.

११. (१) राजपत्रित अधिकाऱ्याच्या दर्जाहून कमी दर्जाचा नसलेला जो कोणताहि इसम राज्य सरकारकडून सामान्य किंवा विशेष आदेशाद्वारें याबाबत अधिकृत करण्यांत आला असेल त्यास पुढील गोष्टी करण्याचा अधिकार आहे:—

(अ) ज्या जमिनीवर इमारत बांधण्याचें किंवा पुन्हा बांधण्याचें किंवा तिचें रूपांतर करण्याचें काम ह्या अधिनियमाच्या उपबंधांचें उल्लंघन करून सुरू करण्यांत, चालू ठेवण्यांत किंवा पार पाडण्यांत येत आहे त्या जमिनीवर प्रवेश करणें व तिची तपासणी करणें ;

(ब) ह्या अधिनियमाचे उद्देश पार पाडण्याकरितां त्यास आवश्यक वाटतील असे प्रश्न कोणत्याहि इसमास विचारणें ;

(क) ज्याच्या खर्चानें इमारत बांधण्याचें, किंवा पुन्हा बांधण्याचें किंवा तिचें रूपांतर करण्याचें काम सुरू करण्यांत, चालू ठेवण्यांत किंवा पार पाडण्यांत आलें असेल अशा कोणत्याहि इसमास किंवा असें काम पार पाडण्यासाठीं कामावर लावलेल्या कोणत्याहि इसमास अशा कामासंबंधीं त्याच्या कबजांत असलेलीं पुस्तकें किंवा दस्तऐवज किंवा त्यास असलेली इतर सर्व माहिती हजर करण्याविषयीं किंवा सादर करण्याविषयीं फर्माविणें ;

(ड) जें कोणतेंहि सामान ह्या अधिनियमाच्या उपबंधांचें उल्लंघन करून इमारत बांधण्याच्या, पुन्हा बांधण्याच्या किंवा तिचें रूपांतर करण्याच्या कामासाठीं जमविलें, खरेदी केलें किंवा अन्यथा मिळविलें आहे असें त्यास सकारण वाटत असेल तें भरणें आणि कलम ९, पोट-कलम (३) च्या उपबंधांस अधीन राहून विहित केलेल्या रीतीनें त्याची विल्हेवाट लावणें.

(२) जो कोणी पोट-कलम (१) अन्वयें अधिकृत केलेल्या इसमास त्या पोट-कलमाअन्वयें दिलेले कोणतेहि अधिकार चालवितांना हेतुपुरस्सर अडथळा करील किंवा त्यास विचारलेल्या कोणत्याहि प्रश्नाचें उत्तर देण्याचें नाकारील किंवा बुद्ध्या खोटें उत्तर देईल किंवा उक्त पोट-कलमाअन्वयें मागितलेलीं कोणतींहि पुस्तकें, दस्तऐवज व इतर माहिती हजर करण्याचें किंवा सादर करण्याचें नाकारील त्यास, दोषी ठरविण्यांत आलें असतां, पराकाष्ठा तीन महिने मुदतीच्या कैदेची शिक्षा होईल किंवा पराकाष्ठा पांचशें रुपये दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

१२. ह्या अधिनियमाअन्वयें सद्‌भावनापूर्वक केलेल्या किंवा जें करण्याचा इरादा आहे अशा कोणत्याहि कृत्याबद्दल कोणत्याहि इसमाविरुद्ध कोणताहि दावा, खटला किंवा इतर वैध कारवाई चालणार नाहीं. ह्या अधिनियमाअन्वयें काम करणाऱ्या इसमांस संरक्षण.

१३. ह्या अधिनियमांतील कोणताहि उपबंध पुढील गोष्टींस लागू असणार नाहीं— बचाव.

(अ) इमारतीच्या विद्यमान पायाचें किंवा छताचें क्षेत्रफळ किंवा तिची एकूण उंची यांत वाढ न होतां व तिचें रूपांतर न होतां झालेले फेरबदल ;

(ब) सबंध इमारत किंवा इमारतीला मजले असल्यास सबंध मजला पुन्हा बांधला न जातां व तिचें रूपांतर न होतां इमारतीचा मोडकळीस आलेला भाग पुन्हा बांधणें ;

(क) भट्टया, चुलीच्या जागा, धूम्रमार्ग, धुराडीं, धुण्याच्या जागा, जलनिस्सारण मार्ग, संडास, मुत्र्या, मलकुंड किंवा नरछिद्र आणि गटारें तपासण्यासाठीं निरीक्षण कोठ्या (इन्स्पेक्शन चेंबर) ;

(ड) पाणी सांठविण्याच्या टाक्या किंवा विहिरी ;

(ई) हद्दीच्या भिंती, आवाराच्या भिंती व कुंपणें ;

(फ) (१) जें सरकारच्या किंवा स्थानिक प्राधिकाऱ्याच्या वतीनें किंवा सरकारशीं किंवा स्थानिक प्राधिकाऱ्याशीं केलेल्या करारानुसार अंगीकृत केलें असेल किंवा पार पाडण्यांत आलें असेल असें इमारत बांधण्याचें, पुन्हा बांधण्याचें किंवा तिचें रूपांतर करण्याचें काम, अथवा

(२) ज्याचा खर्च किंवा खर्चाचा कोणताहि भाग सरकारनें किंवा स्थानिक प्राधिकाऱ्यानें देण्याचें कबूल केलें असेल असें इमारत बांधण्याचें, पुन्हा बांधण्याचें किंवा तिचें रूपांतर करण्याचें काम.

१४. (१) राज्य सरकारास, राजपत्रांत प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारें, ह्या अधिनियमाचे उद्देश पार पाडण्यासाठीं नियम करण्याचा अधिकार आहे. नियम करण्याचा अधिकार.

(२) विशेषेंकरून व वरील अधिकाराच्या सामान्यतेस बाध येऊं न देतां, अशा नियमांत पुढील गोष्टींबाबत तरतूद करतां येईल :—

(१) कलम ४, पोट-कलम (१) अन्वयें करावयाच्या अर्जाचा नमुना व द्यावयाची माहिती;

(२) कलम ११, पोट-कलम (१) अन्वयें अधिकृत केलेल्या इसमांनीं ज्या रीतीनें आपले अधिकार चालविले पाहिजेत व उक्त पोट-कलमाची कंडिका (ड) अन्वयें धरलेल्या सामानाची ज्या रीतीनें विल्हेवाट लावली पाहिजे ती रीत.

१४-अ. ह्या अधिनियमांत कांहींहि असलें तरी, राज्य सरकारास असा निदेश देण्याचा अधिकार आहे कीं, ह्या अधिनियमाअन्वयें नियंत्रकास दिलेले अधिकार व त्याजकडे सोंपविलेलीं कर्तव्यें हीं, ज्या क्षेत्रांत मुंबई गृहनिर्माण मंडळ अधिनियम, १९४८ अमलांत आला असेल त्या क्षेत्रांत उक्त अधिनियमाअन्वयें रचना केलेल्या गृहनिर्माण मंडळाकडून चालविण्यांत व बजाविण्यांत येतील. सन १९४८चा मुंबई अधिनियम ६९ अन्वयें रचना केलेल्या गृहनिर्माण मंडळाकडे नियंत्रकाचे अधिकार सोंपवून देणें.

रद्द करणें. १५. (१) मुंबईचा इमारत बांधण्यावर नियंत्रण ठेवण्याबाबत अध्यादेश, १९४८ हा या-अन्वयें रद्द करण्यांत आला आहे; आणि याअन्वयें असें जाहीर करण्यांत येतें कीं, मुंबई सर्व-साधारण परिभाषा अधिनियम, १९०४, कलमें ७ व २५ यांचे उपबंध उक्त अध्यादेश रद्द झाल्याच्या बाबतींत जणूं उक्त अध्यादेश हा अधिनियम होता असें समजून लागू होतील.

(२) उक्त अध्यादेश रद्द करण्यांत आला असला तरीहि, प्रस्तुत अधिनियम सुरू होण्यापूर्वी उक्त अध्यादेशाचें कलम ४, पोट-कलम (१) अन्वयें केलेला कोणताहि अर्ज प्रस्तुत अधिनियमाच्या तत्सम उपबंधांअन्वयें करण्यांत आला होता असें समजलें पाहिजे:

परंतु, प्रस्तुत अधिनियमाचें कलम ४, पोट-कलम (३) मध्यें सांगितलेली एक महिन्याची मुदत ही, असा अर्ज नियंत्रकास ज्या तारखेस मिळाला त्या तारखेपासून सुरू होते असें समजलें पाहिजे.

## अनुसूचि.

१. मुंबई शहर.

२. मुंबई उपनगर जिल्हा.

३. ठाणें जिल्ह्याचा ठाणें तालुका.